# 2018-2019

Gomantak Times, Dated 11th May, 2019

## Short term course on communication skills conducted

PORVORIM: Vidya Probodhini College, Porvorim conducted short term course on communication skills for students of BABED programme recently.

A total of 34 students participated and availed benefits from the said course. The course emphasised that in order to gain proficiency in communication skills, one has to have a strong desire, concentration, positivity, discipline, good habits, continuity, consistency, patience, good vocabulary and hard work. Besides these the course also stressed on the fact that in order to become an effective communicator one has to develop a good reading, writing and speaking skills.

The course focused on various aspects of communication thereby further equipping the future teachers to function as effective teachers.

The course covered areas like skill development, different aspect of English language, writing of resume/CV, writing of good speeches, writing of application letters, facing job interviews, public speaking, overcoming stage phobia, report writing, maintaining and writing minutes of a meeting, developing soft skills, personal grooming, good etiquettes, organising events etc. The above aspects are explained and discussed with different practical examples.


Prabhakar N Bhate, chairman of Prabodhan Education Society graced the valedictory function as chief guest and urged the students to take their profession seriously and give their very best to the students.

He further added that development of good communication skills is necessary in order to function and adjust in the world today- both personally and professionally. Principal Dr M R Patil, vice principal Dr Sukhaji G Naik and course coordinator Dr Sonali Shankhwalkar were present for the function.

Dr M RPatil and Dr Sonali Shankhwalker, assistant professor in education have conducted the course. Shruti Sawant a student of TYBA B Ed proposed a vote of thanks.

# पर्वरी येथे संप्रेषण कौशल्य लघुअभ्यासिका

पर्वरी, ता. २७ (वार्ताहर) : विद्या प्रबोधिनी वाणिज्य, शिक्षण, संगणक आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पर्वरी येथे फेब्रुवारी ते एप्रिल या काळात बी.ए.बी.एडच्या विद्यार्थ्यांसाठी संप्रेषण कौशल्यावर आधारित लघुअभ्यासिका( शॉर्ट टर्म कोर्स) आयोजित केला होता. या कोर्ससाठी एकूण ३४ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक भाग घेऊन त्याचा लाभ घेतला. या अभ्यासक्रमात संप्रेषणकौशल्य प्राप्तकरण्यासाठी तीव्र इच्छा, एकाग्रता, सकारात्मकता, शिस्त, चांगल्या सवयी, निरंतरता, सातत्य, धैर्य, शब्दसंपत्ती आणि कठोर परिश्रम असणे आवश्यक आहे. एक प्रभावी संप्रेषक बनण्यासाठी चांगले वाचन, लेखन आणि बोलण्याचे कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे या संदर्भात या अभ्यासक्रमात भर देण्यात आला.



पर्वरी : समारोप सोहळ्यात बोलताना श्रुती सावंत व उपस्थित मान्यवर.

या अभ्यासक्रमात विविध पैलूंवर लक्ष केंद्रित केल्यामुळे भविष्यातील शिक्षक प्रभावी शिक्षक म्हणून काम करण्यास सज्ज होतील. विविध कौशल्यांचा विकास, इंग्रजी भाषेचे भित्र पैलू, रेझ्युम, सीव्ही लिहिणे, चांगल्या भाषणांचे लेखन, अक्षरांचा लिहिण्यासाठी उपयोग, नोकरीसाठी मुलाखत घेणे, सार्वजनिक ठिकाणी बोलणे, व्यासपीठाची भीती घालविणे, अहवाल लिहिणे, सभेचे इतिवृत्त लिहिणे, मुलाखत, सौम्य कौशल्यांचा विकास, वैयक्तिक प्रशिक्षण, चांगले शिष्टाचार, कार्यक्रमाचे आयोजन करणे या बाबींवर स्पष्टीकरण आणि विविध व्यावहारिक उदाहरणांसह चर्चा करून विद्यार्थ्यांना शिकविले गेले. या अभ्यासक्रमाबावत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून याचा आपल्याला फायदा झाला हे नमूद केले.

समारोपाच्या कार्यक्रमासाठी प्रबोधन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रभाकर भाटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांना आपला पेशा गांभीर्याने घेण्यास सांगितले तसेच शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वोत्तम ज्ञान दिले पाहिजे. त्यांनी पुढे सांगितले की, आजच्या जगात कार्य आणि समायोजन करण्यासाठी वैयक्तिक संवाद आणि चांगले संवाद कौशल्य आवश्यक आहे. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील, उपप्राचार्य डॉ. सुखाजी नाईक आणि अभ्यासक्रम समन्वयक डॉ. सोनाली शंखवाळकर हे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. सोनाली शंखवाळकर यांनी हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. तृतीय वर्ष बी.ए.बी.एड.चीविद्यार्थिनी कु. श्रुती सावंत हिने मान्यवरांचे व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

दैनिक हेरल्ड - 10/11/2021


# प्रबोधीनीत 'मूलभूत बँकींग सेवा' अभ्यासक्रम

पणजी, दि. ९ (प्रतिनिधी):

विद्या प्रबोधीनी महाविद्यालय, टीजेएसबी सहकारी बँकेच्या संयुक्त विद्यमाने मूलभूत बँकींग सेवा या विषयावर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पर्वरी येथील विद्या प्रबोधीनी महाविद्यालयात १५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर दरम्यान हा अभ्यासक्रम प्रत्यक्ष व ऑनलाईन माध्यमातून शिकविण्यात येईल, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य भूषण भावे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी टीजेएसबी बँकेचे विभागीय प्रमुख अरूण भट, विद्याप्रबोधिनीचे अध्यक्ष संजय वालावलकर, प्रा. दर्शन गावकर, प्रा. सनी पांढरे आदी उपस्थित होते. विद्याप्रबोधीनी संस्थेच्या ४० वाणिज्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी नाव नोंदणी केली आहे. हा अभ्यासक्रम ४० तासांचा असेल. प्रा. दर्शन गावकर या अभ्यासक्रमाचे समन्वयक तर प्रा. सनी पांढरे हे सहसमन्वयक आहे.

बँकमधील विविध सेवा, मोबाईल माध्यमातून बँकींगच्या विविध सुविधांचा परिचय व हाताळणीचे कौशल्य विकसीत करणे हे हा अभ्यासक्रम आखणीचे प्रमुख प्रयोजन असल्याचे भावे यांनी सांगितले. या अभ्यासक्रमात निधी ट्रान्सफर, ऑनलाईन पेमेंट, मोबाईल रिचार्ज, ईकेव्हायसी, म्युचुअल फंड, जनरल विमा, डिमॅट खाते, कर संबंधी नियोजन, पेन्शन योजना आदी गोष्टींचा समावेश आहे. भविष्यात या संदर्भातील डिप्लोमा अभ्यासक्रम देखील सुरू करण्याचा विचार असून राज्यभरातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल, असे ते म्हणाले. टीजेएसबी बँकेचे सहकारी बँकेत प्रत्यक्ष कामाचा अनुभव या वेळी देतील, अशी माहिती अरूण भट यांनी दिली.




पणजी : विद्या प्रबोधीनी कॉलेजच्या पत्रकार परिषदेत बोलताना संजय वालावलकर, प्रा. दर्शन गावकर, प्रा. भूषण भावे व इतर. (कैलास नाईक)

विद्यार्थ्यांना नवीन शिक्षण धोरणाला तयार करण्याच्या दृष्टीने विद्याप्रबोधीनी संस्थेतर्फे विविध उपक्रम आयोजित केले जातात, त्याचाच हा अभ्यासक्रम एक भाग असल्याची माहिती वालावलकर यांनी दिली. विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

टीजेएसबी बँकेचे कर्मचारी तसेच विद्याप्रबोधीनीतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन या अभ्यासक्रमाला लाभेल, अशी माहिती दर्शन गावकर यांनी दिली.

विनायक (अनिल) पांडुरंग ... (Retd. Executive Engineer Electricity Department)

तरुण भारत
बुधवार, १० नोव्हेंबर २०२१

# मूलभूत बँकिंग सेवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## प्रबोधन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय वालावलकर यांची माहिती : टीजेएसबी सहकारी बँक, विद्याप्रबोधिनी कॉलेजतर्फे वर्गाचे आयोजन

प्रतिनिधी
पणजी

विद्याप्रबोधिनी महाविद्यालय आणि टीजेएसबी सहकारी बँके यांच्या विद्यमाने मूलभूत बँकिंग सेवा या विषयावर प्रमाणपत्र अभ्याक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम एकूण ४० दिवसांचा असेल, अशी माहिती प्रबोधन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय वालावलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पणजीत घेण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेवेळी वालावकर यांच्यासोबत टीजेएसबी सहकारी बँकेचे अरुण भट तसेच विद्याप्रबोधिनी कॉलेजचे प्राचार्य डॉ. भूषण भावे व अन्य प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा. दर्शन गावकर हे अभ्यासक्रमाचे समन्वयक असतील तर प्रा. सनी पांढरे सह-समन्वयक म्हणून काम पाहतील. १५ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर २०२१ पर्यंत कॉलेजच्या आवारात चालणारा हा अभ्याक्रम प्रत्यक्षवर्गात तसेच ऑनलाईन माध्यमातून घेण्यात येईल, असे वालावलकर यांनी सांगितले.

वाणिज्य शाखेतील एकूण ४० विद्यार्थ्यांनी यासाठी आपली नावनोंदणी केली आहे. अभ्यासक्रमाच्या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थी संगणकीय प्रणालीतून वस्तूनिष्ठ प्रश्नपत्रिका सोडवतील. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना विद्याप्रबोधिनी आणि टीजेएसबी सहकारी बँकेच्यावतीने प्रमाणपत्र दिले जाईल. बँकिंगमधील विविध सेवा, मोबाईल माध्यमातून बँकिंगच्या विविध सुविधांचा परिचय व हाताळणीचे कौशल्य विकसित करणे हे अभ्यासक्रमाच्या आखणीचे मुख्य उद्दीष्ट आहे, असे ते म्हणाले.



पणजी : पत्रकार परिषदेत माहिती देताना विद्याप्रबोधिनीचे अध्यक्ष संजय वालावलकर. सोबत अरूण भट, दर्शन गावकर, प्रा. भूषण भावे, सनी पांढरे

या अभ्यासक्रमात निधी ट्रान्सफर, ऑनलाईन पेमेंट, मोबाईल रिचार्ज, के.व्हाय.सी. आदी विषयांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. म्युच्युअल फंड, जनरल विमा, डिमांड खाते, कर संबधी नियोजन, पेन्शनर्स योजना इत्यादी बाबींचा समावेश या अभ्यासक्रमात आहे. तसेच प्रशिक्षणार्थींना टीजेएसबी सहकारी बँकेत प्रत्यक्ष बँकेतील कामाचा अनुभव मिळणार आहे. बँकेतील अधिकारीवर्ग प्रध्यापक तसेच या क्षेत्रातील जाणकार व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळणार आहे, असेही वालावलकर यांनी सांगितले.

सुरुवातीला ४० विद्यार्थ्यांच्या तुकडीने अभ्याक्रम सुरु करण्यात येणार असून पुढे त्यात विविध बदल करून अधिकाधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असेही वालावलकर म्हणाले.

शिक्षण क्षेत्रात संस्थेने मोठे शिखर गाठले आहे. काळानुसार विविध बदल करून काळासोबत चालण्याचा प्रयत्नही केला आहे. सद्यस्थितीत शिक्षण धोरणात बदल करून तांत्रिक शिक्षणाला अधिक महत्त्व देण्याचे ठरविण्यात आले आहे. प्रबोधन शिक्षण संस्थेने त्यादृष्टीने पाऊले उचलण्यास सुरुवात केली असून त्याचाच एक भाग म्हणून हा अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहे, असे वालावलकर यांनी सांगितले.

यावेळी अरुण भट यांनी बँकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी सविस्तर माहिती पत्रकारांना दिली.

# पर्वरीत प्रमाणपत्र पत्रकारिता उपक्रमाला प्रारंभ

पर्वरी दि.१० (प्रतिनिधी):

पत्रकारिता हे धगधगते अग्निकुंड आहे. ते क्रांती घडवणारे शस्त्र आहे. या क्षेत्रामध्ये शिरताना मुख्यतः आपले अंगी धाडस असणे आवश्यक आहे. भाषा शुद्ध असणे गरजेचे आहे. आपल्या मनातील लेखक आणि डोळसपणे शहानिशा करून बातमीचा पाठपुरावा करणारा पत्रकार यांची योग्य सांगड घालता आली पाहिजे अशा शब्दांत जयंत संभाजी यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन केले. विद्या प्रबोधिनी महाविद्यालय मराठी विभाग आणि गोवा मराठी अकादमी, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने विद्या प्रबोधिनी महाविद्यालयात प्रमाणपत्र पत्रकारिता उपक्रमाला प्रारंभाच्या पहिल्या दिवशी प्रमुख अतिथी आणि मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ पत्रकार संभाजी उपस्थित होते. व्यासपीठावर गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण भावे, मराठी विभागप्रमुख प्रा. योगिता चोडणकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. उत्कर्षा राऊत, हर्षदा च्यारी, दिव्या च्यारी आणि अक्षता माईणकर यांनी पत्रकारितेवर आधारित सुमधुर पोवाडा सादर केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण भावे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. योगिता चोडणकर यांनी उपक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. माननीय प्रा. अनिल सामंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन आणि प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. दिव्या मेळेकर हिने उपस्थितांचे आभार मानले व सत्राची सांगता झाली. कविता गावडे हिने सत्राच्या सूत्रसंचालनाची सूत्रे सांभाळली.



**पर्वरी : प्रमाणपत्र पत्रकारिता उपक्रमात बोलताना प्राचार्य भूषण भावे. सोबत मान्यवर.** (शेखर वायंगणकर)


**LOST & FOUND**

I, Ms. ALFA JOANES, r/o House No. 247, Bhuttea Bhat, Opp. Junta Quarters, Patrong, Vasco Da Gama, Goa 403802 have to state that I have misplaced the SBI Life Insurance policy no. 53009522302 standing in the name SELF. In case anyone finds it, please contact 8806456151.

VILLAGE PANCHAYAT TELAULIM
Salcete, Goa
Ref No. VPT/2022-23/85/A Dated 07/05/2022
**Notice Inviting Quotation**
Sealed lowest rate quotations are hereby invited by the Sarpanch of Village Panchayat Tolaulim, Salcete, Goa, from authorized Dealers / Suppliers / Manufacturers for supplying following items respectively for the


# पर्वरीत पत्रकारिता प्रमाणपत्र उपक्रम सुरू

पर्वरी (न. प्र.)


पत्रकारिता हे धगधगते अग्निकुंड आहे. तसेच ते क्रांती घडवणारे शस्त्र आहे. या क्षेत्रामध्ये शिरताना मुख्यतः आपल्या अंगी धाडस असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर भाषा शुद्ध असणे गरजेचे आहे. आपल्या मनातील लेखक आणि डोळसपणे शहानिशा करून बातमीचा पाठपुरावा यांची योग्य सांगड घालता आली पाहिजे, अशा शब्दांत जयंत संभाजी यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गाला मार्गदर्शन केले.

विद्या प्रबोधिनी महाविद्यालय मराठी विभाग आणि गोवा मराठी अकादमी, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने विद्या प्रबोधिनी महाविद्यालयात प्रमाणपत्र पत्रकारिता उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

सोमवार दि. ९ मे रोजी या उपक्रमाची सुरुवात झाली. यावेळी गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण भावे, मराठी विभागप्रमुख प्रा. योगिता चोडणकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. कु. उत्कर्षा राऊत, कु. हर्षदा च्यारी, कु. दिव्या च्यारी आणि कु. अक्षता माईणकर यांनी पत्रकारितेवर आधारित सुमधुर पोवाडा सादर केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भावे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. योगिता चोडणकर यांनी उपक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. त्यानंतर प्रा. अनिल सामंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन आणि प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. कु. कविता गावडे हिने सत्राच्या सूत्रसंचालनाची सूत्रे सांभाळली. तर कु. दिव्या मेळेकर हिने उपस्थितांचे आभार मानले व सत्राची सांगता झाली.



प्रमाणपत्र पत्रकारिता कार्यक्रमात बोलताना प्राचार्य भूषण भावे. सोबत इतर मान्यवर. (छाया : शेखर वायंगणकर)


Vidya Prabodhini College of Commerce, Education, Computer & Management
Vidyanagar, Parvari Goa

# 2022-2023

पुढारी – 24/5/2022

# विद्या प्रबोधिनी महाविद्यालयात यंदा कौशल्यविकास अभ्यासक्रम

पणजी (प्रतिनिधी)

पर्वरी येथील विद्या प्रबोधिनी वाणिज्य, शिक्षण, संगणक आणि व्यवस्थापन महाविद्यालयातर्फे पॉलिसी ॲडव्होकसी रिसर्च सेंटर बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने भांडवली बाजार, म्युच्युअल फंड यात कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. यानिमित्त येत्या २७ मे रोजी संध्याकाळी ४ वाजता इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा सभागृहात बॉम्बे स्टॉक एक्सजेंचचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष कुमार यांचे खास व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भूषण भावे यांनी पत्रकार परिषदेत येथे काल दिली.

## शुक्रवारी खास व्याख्यान

स्वयंपूर्ण गोवा उपक्रमासाठी युवकांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची उद्दिष्टे बाजारपेठेशी संबंधित कौशल्यांचे पुरेसे प्रशिक्षण प्रदान करणे आणि बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रांतील महिला व तरुणांची रोजगारक्षमता आणि उद्योजकता कौशल्ये वाढवणे आणि प्रतिभा विकासाच्या संधी निर्माण करणे हे आहे. ह्यासाठीचे अभ्यासक्रम आगामी शैक्षणिक वर्ष २०२२ ते २०२३ मध्ये आयोजित केले जातील. या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आणि अनुभवी संसाधन व्यक्ती बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज आणि इतर वित्तीय संस्थांमधून असतील.

या पार्श्वभूमीवर आशिष कुमार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले असून बीएफएसआय क्षेत्राशी संबंधित विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, पर्यटन मंत्री रोहन खंवटे उपस्थित राहणार आहेत, असे प्राचार्य भावे यांनी सांगितले. यावेळी कौस्तुभ काळोखे, वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. उज्ज्वला हणजूणकर, राजकुमार देसाई व इतरांची उपस्थिती होती.

गोवन वार्ता – 24/5/2022



पत्रकार परिषदेत उपस्थित (डावीकडून) प्रा. अरुण मराठे, कौस्तुभ काळोखे, प्राचार्य भूषण भावे, राजकुमार देसाई, प्रा. डॉ. उज्ज्वला हणजूणकर.

# 'विद्याप्रबोधिनी'तर्फे वित्तीय सेवा अभ्यासक्रम

- तज्ज्ञांचे लाभणार मार्गदर्शन : माहितीसाठी शुक्रवारी खास सत्र

प्रतिनिधी । गोवन वार्ता

पणजी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आत्मनिर्भर भारताची संकल्पना केंद्रस्थानी ठेवून राज्यात स्वयंपूर्ण गोवा मोहीम राबविली जात आहे. त्यातून प्रेरणा घेत 'विद्या प्रबोधिनी' बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करत आहे. या क्षेत्रांविषयी माहिती तसेच भविष्यातील संधी या संदर्भात मार्गदर्शन संस्था व धोरण अधिवक्ता संशोधन केंद्राच्या (पीएआरसी) वतीने आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार, २७ मे रोजी सायंकाळी ४ वाजता इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा येथे हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. उज्ज्वला हणजूणकर यांनी दिली.

सोमवारी पणजी येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य भूषण भावे, सहायक प्राध्यापक अरुण मराठे, संस्थेचे सदस्य राजकुमार देसाई, 'पीएआरसी'चे साहाय्यक व्यवस्थापक कौस्तुभ काळोखे उपस्थित होते. 'विद्या प्रबोधिनी'मध्ये विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्यातील तरुण व महिलावर्गाला बाजारपेठेशी संबंधित कौशल्यांसंदर्भात प्रशिक्षण देणे, त्यांची उद्योजकता कौशल्ये वाढविणे व विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे हे या अभ्यासक्रमांचे मुख्य उद्दिष्ट असणार आहे. साधारण ४५-४८ तासांचा एक अभ्यासक्रम अशाप्रकारे हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणासाठी बहुतांश मार्गदर्शक हे बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज व अन्य वित्तीय संस्थांमधून येतील, अशी माहिती प्राचार्य भावे यांनी दिली. राज्यातील कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण असलेली व्यक्ती या अभ्यासक्रमासाठी प्रविष्ट होऊ शकतात.

## मुख्यमंत्री राहणार उपस्थित

शुक्रवारी होणाऱ्या मार्गदर्शन सत्रात अभ्यासक्रमांच्या बाबतीत माहिती दिली जाणार आहे. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. पर्यटन व माहिती तंत्रज्ञान मंत्री रोहन खवंटे सन्मानीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यातील शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी, उद्योगसंस्था प्रतिनिधी या साऱ्यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य भावे यांनी केले आहे.

Bhangarbuy 24/05/2022

# शुक्रारा बँकिंग, वित्तीय सेवा, विमो मार्गदर्शन

## विद्या प्रबोधिनी आनी धोरण अधिवक्ता संशोधन केंद्राचें आयोजन



**पत्रकार परिशेंक हाजीर आशिल्ले (दावे वटेन) प्रा. अरुण मराठे, कौस्तुभ काळोखे, प्राचार्य भूषण भावे, राजकुमार देसाय आनी डॉ. उज्ज्वला हणजुणकर**

**भांगरभूंय । प्रतिनिधी**

**पणजी:** पंतप्रधान नरेंद्र मोदी हांच्या आत्मनिर्भर भारताची संकल्पने प्रमाण गोंयांत स्वयंपूर्ण गोंय मोहीम चालीक लायतात. ताचोच एक वांटो म्हणून विद्या प्रबोधिनी वेगवेगळ्या मळांतल्या विद्यार्थ्यांक स्वावलंबी जावपा खातीर अभ्यासक्रम सुरू करता. त्या खाला बँकिंग, वित्तीय सेवा आनी विमो मळा कडेन संबंदीत अभ्यासक्रम विद्या प्रबोधिनींत सुरू करतले. त्या मळाची म्हायती तशेंच फुडारांतल्यो संदी हे विशीं संस्था आनी धोरण अधिवक्ता संशोधन केंद्रा वतीन (पीएआरसी) मार्गदर्शन करतले.

शुक्रार 27 मेक सांजे 4 वरांचेर पणजे इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा सभाघरांत ही कार्यावळ जातली अशी म्हायती विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाची मुखेली प्रा. डॉ. उज्ज्वला हणजूणकर हिणे सोमवाराक पणजे एके पत्रकार परिशदेंत दिली. ह्या वेळार प्राचार्य भूषण भावे, सहायक प्राध्यापक अरुण मराठे, संस्थेचे वांगडी राजकुमार देसाय, पीएआरसीचे सहायक वेवस्थापक कौस्तुभ काळोखे हाजीर आशिल्ले.

विद्या प्रबोधिनींत वेगवेगळे प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचें आयोजन करतात. राज्यांतले तरणाटे आनी बायलांक बाजारपेठे कडेन संबंदीत कुशळताये संबंदांत प्रशिक्षण दिवप, ताची उद्देगीक कुशळताय वाडोवप आनी उदरगत करप ह्या हेतान हे अभ्यासक्रम आयोजीत करतले. साधारण 45-48 वरांत एक अभ्यासक्रम अशे तरेन हें प्रशिक्षण दितले. प्रशिक्षणा खातीर चडशे मार्गदर्शक बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज आनी हेर वित्तीय संस्थांतल्यान येतले अशी म्हांयती भावे हांणी दिली. खंयच्याय शिक्षण फांट्यांत 12वी पास जाल्ल्या विद्यार्थ्यां खातीर हो अभ्यासक्रम आसतलो अशें तांणी सांगलें.

शुक्रवारक जावपी मार्गदर्शन सत्रांत अभ्यासक्रमांची म्हायती दितले. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत कार्यावळीची येजमानकी चलयतले. पर्यटन आनी म्हायती तंत्रगिन्यान मंत्री रोहन खवंटे सोयरे म्हणून हाजीर रावतले. शिक्षणतज्ञ, विद्यार्थी, उद्देग संस्थांच्या प्रतिनिधींनी हाजीर रावचें अशें भावे हांणी मागलां.

गोमन्तक - 24/05/2022

# विद्याप्रबोधिनीतर्फे शेअरबाजारवर वर्ग

## डॉ. भूषण भावे : अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन



पणजी : माध्यमांशी बोलताना डॉ. भूषण भावे, राजकुमार देसाई, कौस्तुभ काळोखे, डॉ. उज्वला हणजुणकर व अरुण मराठे.

**पणजी, ता. २३ (प्रतिनिधी)** : विद्या प्रबोधिनी वाणिज्य महाविद्यालय, शिक्षण, संगणक आणि व्यवस्थापन, पर्वरीद्वारे येणाऱ्या शैक्षणिक वर्षात पॉलिसी ॲडव्होकसी रिसर्च सेंटर व बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने भांडवली बाजार, म्युच्युअल फंड यात कौशल्य विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणार असल्याची माहिती प्रा. डॉ. भूषण भावे यांनी दिली.

पणजी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राजकुमार देसाई, कौस्तुभ काळोखे, डॉ. उज्वला हणजुणकर, प्रा. अरुण मराठे उपस्थित होते. भावे म्हणाले, महाविद्यालयाद्वारे टुरिस्ट गाईड, रूम अटेंडन्ट, पत्रकारिता अशा अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात येत आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी स्टॉक मार्केटबद्दल प्रशिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश गोव्यात पहिल्यांदाच करण्यात आला असून, बारावी उत्तीर्ण गोव्यातील सर्व शाखांचे विद्यार्थी त्यात सहभागी होऊ शकतात.

युवकांना स्वावलंबी बनवावे तसेच बाजारपेठेशी संबंधित कौशल्यांचे पुरेसे प्रशिक्षण प्रदान करणे, बँकिंग, वित्तीय सेवा आणि विमा क्षेत्रातील महिला आणि तरुणांची रोजगारक्षमता आणि उद्योजकता कौशल्ये वाढवणे, प्रतिभा विकासाच्या संधी निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. या अभ्यासक्रमात राज्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

### व्याख्यानाचे आयोजन; आशिष कुमार चौहान करणार मार्गदर्शन

विद्या प्रबोधिनी महाविद्यालय आणि पॉलिसी ॲडव्होकसी रिसर्च सेंटर यांनी संयुक्तपणे २७ रोजी इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा सभागृहात सायंकाळी ४ वाजता व्याख्यानाचे आयोजन केले आहे. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्यूट क्षेत्रातील संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे, हा या व्याख्यानाचा उद्देश आहे. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ आशिष कुमार चौहान या कार्यक्रमात मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत असणार असून, सन्माननीय अतिथी म्हणून मंत्री रोहन खंवटे उपस्थित असणार आहेत.

तरुण भारत - 24/05/2022

# पणजीत २७ रोजी वित्तीय सेवेवर व्याख्यान

## प्रा. भूषण भावे यांची माहिती

प्रतिनिधी

पणजी

विद्याप्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स, एज्युकेशन, कॉम्प्युटर ॲण्ड मॅनेजमेंट पर्वरी, पॉलिसी ॲडव्होकसी रिसर्च सेंटर बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्यूटच्या सहकार्याने भांडवली बाजार, म्यच्युअल फंड, यात कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या संदर्भात विद्याप्रबोधिनी कॉलेज व पार्क यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २७ रोजी सायं. ४ वा. इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा सभागृहात बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ आशिष कुमार चौहान यांचे व्याख्यान होणार असल्याची माहिती विद्याप्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य प्रो. भूषण भावे यांनी पणजीत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.



पणजी :- पत्रकार परिषदेत बोलताना प्रा. डॉ. भूषण भावे. बाजूला कौस्तुभ काळोखे, अरूण मराठे, राजकुमार देसाई, डॉ. उज्वला हणजुणकर.

यावेळी वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. उज्वला हणजुणकर, पार्कचे साहाय्यक व्यवस्थापक कौस्तुभ काळोखे उपस्थित होते.

गोव्यात वाणिज्य अभ्यासक्रमासाठी २१ कॉलेज आहेत. या कॉलेजमधून २५००हून जास्त विद्यार्थी वाणिज्य विभागातून पदवीधर होतात. उत्तीर्ण झाल्यानतर विद्यार्थी त्यांच्या शिक्षणासंबंधित नसलेले व्यवसाय करतात. त्यामुळे या विभागातील मुलांना त्यांच्यातील कौशल्य पाहून रोजगार करण्यायोग्य बनविता येईल यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर विद्याप्रबोधिनी कॉलेजमध्ये टुरिस्ट गाईड, रूम अटेंडंट, पत्रकारिता यासारखे अनेक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहे. आता बॉम्बे स्टॉक एक्सचेंज कॉलेजमध्ये पहिल्या प्रथम प्रवेश करत आहे. कुठल्याही विभागातील विद्यार्थी यामध्ये प्रवेश घेऊ शकतात, अशी माहिती प्रो. भूषण भावे यांनी दिली.

युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३मध्ये सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांसाठी प्रसिद्ध आणि अनुभवी संसाधन व्यक्ती बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि इतर वित्तीय संस्थामधून असतील. हे अभ्यासक्रम सर्वांसाठी खुले असतील. पहिल्यांदा अभ्यासक्रम २०-२[illegible] विद्यार्थ्यांच्या बॅचनुसार सुरू करण्यात येतील आणि दोन किंवा तीन कोर्सेस सुरू करण्यात येईल, अशी माहिती प्रो. भावे यांनी दिली.

Navhind Times 28/05/2022

# BSE CEO wants Goa to cash in on BPO, IT boom

## Says the two sectors can give jobs to a large number of youth

**Staff Reporter**
Panaji




BSE managing director and CEO Ashishkumar Chauhan, speaking at a function of Vidya Prabodhini College of Commerce, Education and Computer Management, Porvorim.

Amid efforts by the government to make the state a hub for information technology (IT), the Bombay Stock Exchange (BSE) managing director and chief executive officer (CEO) Ashishkumar Chauhan on Friday suggested that Goa must focus on business process outsourcing (BPO) and IT services units.

He said that BPOs and IT services require graduate-level skills and have the ability to give large number of jobs to local youth.

"BPOs serve Indian as well as international countries. Large portion of the world's back office work of banks, insurance and retail companies is run from India. BPOs will provide employment to the scores of Goan commerce graduates who pass out of the local colleges," said Chauhan, in his key-note address at a function organised by Vidya Prabodhini College of Commerce, Education and Computer Management, Porvorim.

Chauhan spoke on Swayampurna Goa in Banking, Financial Services and Insurance (BFSI) and insurance sector. He spoke on the origins of the BSE which is the first stock exchange of Asia. "Every one rupee out of three rupees of wealth created in India comes from the BSE," said Chauhan.

He said that Goan commerce graduates can branch out in financial services or stock trading.

"Today a large portion of the world is into trading. BSE conducts specialised training courses for commerce graduates in share trading, financial modeling, mutual fund certification, etc. Such courses are job-oriented as well as entrepreneurial," pointed out the BSE CEO.

The function was held to announce a MOU between the college and Policy Advocacy Research Centre (PARC) and BSE for short-term courses in BFSI.

Earlier during the event, Minister for Tourism and IT Rohan Khaunte, who presided over the function, said that the biggest challenge faced in implementing the Goa IT Policy 2021, is "finding the right skill set."

Other dignitaries present were Sanjay Walawalkar, chairman of Prabodhan Education Society; Kiran Shelar, founder-director of PARC; Dr Bhusan Bhave, principal of Vidya Prabodhini College and Arun Marathe, assistant professor.

Goa has 21 commerce colleges and about 2,500 commerce graduates pass out every year, it was disclosed during the function.

Gomantak
28/05/22




पणजी: अशोककुमार चौहान यांचा सत्कार करताना रोहन खंवटे. सोबत उज्ज्वला हणजूणकर, संजय वालावलकर, भूषण भावे व इतर मान्यवर. (संदीप देसाई)

# विद्याप्रबोधिनी महाविद्यालयामध्ये आता कौशल्य विकास अभ्यासक्रम

पणजी, ता. २७ (खास प्रतिनिधी) : मानवी प्रगतीसाठी विकासाच्या टप्प्यांना महत्त्वाचे स्थान आहे. भारत देश प्रगतीच्या शिखरावर जाण्यासाठी नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे आवश्यक आहे, असे मत बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे (बीएसई) मुख्य कार्यकारी अधिकारी आशिषकुमार चौहान यांनी व्यक्त केले.

विद्याप्रबोधिनी महाविद्यालयातर्फे पणजीत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे, संस्थेचे अध्यक्ष संजय वालावलकर, प्राचार्य भूषण भावे आणि ''पार्क'' संस्थेचे किरण शेलार उपस्थित होते. यावेळी विद्याप्रबोधिनी महाविद्यालय, पार्क संस्था आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंज इन्स्टिट्यूटमध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करण्यांबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार विद्यार्थ्यांना भांडवली बाजार, म्युच्युअल फंड, बॅंकिंग, वित्तीय सेवा आणि विमा सेवा यांबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यावेळी मंत्री रोहन खंवटे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## भारतीय तंत्रज्ञानाचा युरोपीय देशांकडून वापर

यावेळी चौहान यांनी जगभर फोफावलेल्या आर्थिक विकास आणि वाणिज्य विषयाच्या इतिहासाची माहिती देत इतिहासात अंकगणित, व्यापार, कंपनी, शेअर बाजार कसा निर्माण झाला, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, जो समाज तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करतो, तेच पुढे जातो. शोधाप्रमाणे नव्या गोष्टींचा स्वीकार करणेही आवश्यक असते. प्राचीन भारतात तंत्रज्ञान होते. मात्र, त्याचा वापर अरबी आणि युरोपियन देशांनी केला.

---

लोकमत गोवा 28/05/22

# कौशल्ये वापरुन स्वयंपूर्ण व्हा

## मंत्री रोहन खंवटे; 'विद्याप्रबोधिनी'चा पार्क संस्थेसोबत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

पणजी : 'पदव्युत्तर झाल्यानंतर सर्वांना सरकारी पदे पाहिजे. कुणालाही आपले स्वत:चे काही वेगळे तयार करायचे नसते, या मानसिकतेमुळे आम्ही कुठेतरी मागे राहत आहोत. प्रत्येकाकडे वेगळे कौशल्य आहे. सरकारी नोकरीच्या मागे न धावता या कौशल्याचा उपयोग आपले वेगळे अस्तित्व तयार करण्यासाठी वापरावे. उद्योग, माहिती आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात आज असंख्य संधी उपलब्ध आहे. या संधीचा पुरेपूर उपयोग करून युवकांनी स्वयंपूर्ण बनण्यावर भर द्यावा,' असे प्रतिपादन माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे यांनी केले.




विद्याप्रबोधिनीच्या कार्यक्रमात बोलताना माहिती व तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे.

इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा येथे शुक्रवारी पर्वरी येथील विद्याप्रबोधिनी महाविद्यालयातर्फे पॉलिसी ॲडव्होकसी रिसर्च सेंटर (पार्क) यांच्या सहाय्याने बॅंकिंग फायनान्शियल सर्विसेस आणि इन्शुरन्स क्षेत्रात कशाप्रकारे स्वयंपूर्ण गोवा घडवू शकतो, या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री रोहन खंवटे उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून बॉम्बे स्टॉक मार्केटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष कुमार चौहान उपस्थित होते. त्यांच्यासोबत विद्या प्रबोधिनीचे संजय वालावलकर, डॉ. भूषण भावे, पार्कचे प्रमुख किरण शेलार व पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विद्याप्रबोधिनी महाविद्यालय व पार्क यांच्यात सामंजस्य करार झाला. दरम्यान आशिष कुमार चौहान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Goan Varta 29/05/22 **राज्य**

# योग्य कौशल्य विकसित केल्यास संधी खुल्या होतील : रोहन खंवटे

## विद्या प्रबोधिनीच्या मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



आशिषकुमार चौहान यांचे स्वागत करताना मंत्री रोहन खंवटे. सोबत उपस्थित मान्यवर.

प्रतिनिधी । गोवन वार्ता

पणजी : उद्योजकता आणि रोजगार हा प्रत्येकासाठी महत्त्वाचा प्रश्न असतो. तसे पाहायला गेले तर गोवा हे केवळ १५ लाख लोकसंख्या असणारे राज्य आहे. योग्य कौशल्य असेल तर मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होऊ शकतात, असे मार्गदर्शन माहिती व तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे यांनी केले.

विद्याप्रबोधिनी शिक्षण संस्था व बॉम्बे स्टॉक एक्सचेंज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वित्तीय क्षेत्रातील विविध संधीच्या मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष संजय वालावलकर, विद्याप्रबोधिनीचे प्राचार्य भूषण भावे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. उज्ज्वला हणजूणकर, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे सीईओ आशिषकुमार चौहान, किरण शेलार उपस्थित होते.

राज्यातील आयटी धोरणे ही देशातील सर्वोत्कृष्ट धोरणे असल्याचे सांगत दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांची आठवण त्यांनी काढली. स्वयंपूर्ण गोवा अंतर्गत २.० सरकार आता या धोरणांची अमलबजावणी करेल असे ते म्हणाले. योग्य कौशल्य असणारे तरुण उत्तम वार्षिक पगारासह नोकरी मिळवितात. त्यामुळे कौशल्य प्राप्त करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते आशिषकुमार चौहान म्हणाले, भारतीय नागरिक मुळातच बदल अनुकरण्यात निपुण असतात. तंत्रज्ञान म्हणजे दुसरे तिसरे काही नसून याआधी जे झालेले नाही ते करणे म्हणजे तंत्रज्ञान आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. इंग्रज, पोर्तुगीज यांनी कशाप्रकारे भारतीय नागरिकांच्या बुद्धिमत्तेचा वापर करून घेतला, हेही त्यांनी सोदाहरण सांगितले. विविध उदाहरणे देत कौशल्य विकसित करण्याची गरज त्यांनी लक्षात आणून दिली. प्राचार्य भावे यांनी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी आपल्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्रात केलेल्या कामाबद्दल त्यांचे कौतुक केले. स्वयंपूर्ण गोवा बनवायचा असेल तर विविध क्षेत्रातील छोट्या छोट्या अभ्यासक्रमाची गरज त्यांनी व्यक्त केली. राज्यभरातून विद्यार्थी व पालक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

Gomantak 01/06/2023

# लायब्ररी सायन्स सर्टिफिकेट कोर्सला उत्स्फूर्त प्रतिसाद



पर्वरी : प्रमाणपत्र वितरित कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर व सहभागी विद्यार्थी.

पणजी, ता. ३१ (प्रतिनिधी): पर्वरी येथील विद्याप्रबोधिनी महाविद्यालय यांच्या ग्रंथपाल विभागातर्फे लायब्ररी सायन्समध्ये प्रमाणपत्र कोर्स संपन्न झाला. यात राज्यभरातील ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहा दिवसीय कोर्सला नोवेल्टी वळवईकर (गोवा विद्यापीठ), सोनिया देसाई, (स्वामी विवेकानंद महाविद्यालय, बोरी), बाळा मांद्रेकर (नारायण झांट्ये महाविद्यालय, डिचोली) व प्रयांगी मातोणकर (डॉ. दादा वैद्य महाविद्यालय, फोंडा) या ग्रंथपालांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून सहकार्य केले.

प्रमाणपत्र वितरीत कार्यक्रमाला प्रबोधन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय वलावलकर, डॉ. अनिल ठोसरे, उपप्राचार्य विद्या प्रबोधिनी महाविद्यालय व नितेश नाईक, ग्रंथपाल विद्या प्रबोधिनी महाविद्यालय उपस्थित होते. वालावलकर यांनी ग्रंथपाल विभागाचे लायब्ररीमध्ये सर्टिफिकेट कोर्स आयोजित केल्याबद्दल अभिनंदन केले. सूत्रसंचालन गौरेश बगळी तर नीतेश नाईक यांनी आभार मानले.

Lokmat 01/06/2023

# विद्याप्रबोधिनीत लायब्ररी सायन्स अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

पर्वरी : विद्या प्रबोधिनी महाविद्यालय यांच्या ग्रंथपाल विभागातर्फे लायब्ररी सायन्समध्ये सर्टिफिकेट कोर्स झाला. सर्टिफिकेट कोर्समध्ये राज्यातील विविध भागातील एकूण ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहा दिवस घेण्यात आलेल्या या कोर्सला मार्गदर्शक म्हणून नोवेल्टी वळवईकर (गोवा विद्यापीठ), सोनिया देसाई (स्वामी विवेकानंद महाविद्यालय, बोरी), बाळा मांद्रेकर (नारायण झांट्ये महाविद्यालय, डिचोली) व प्रयांगी मातोंडकर (डॉ. दादा वैद्य महाविद्यालय, फोंडा) या ग्रंथपालांनी मार्गदर्शक म्हणून सहकार्य केले.

प्रमाणपत्र वितरित कार्यक्रमाला प्रबोधन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय वालावलकर, डॉ अनिल ठोसरे, उप-प्राचार्य विद्या प्रबोधिनी महाविद्यालय व नितेश नाईक, ग्रंथपाल विद्या प्रबोधिनी महाविद्यालय उपस्थित होते. अध्यक्ष वालावलकर यांनी ई-वाचन व प्रत्यक्ष पुस्तक वाचन व त्याचे महत्त्व याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरेश बगळी, तर आभार ग्रंथपाल नितेश नाईक यांनी मानले.



पर्वरी विद्याप्रबोधिनीत लायब्ररी सायन्स अभ्यासक्रमात सहभागी विद्यार्थ्यांसमवेत मान्यवर. (छाया : शेखर वायंगणकर)

Vidya Prabodhini College of Commerce, Education, Computer & Management, Vidyanagar, Porvorim, Goa